2 3 AUG 2026

तरूण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारत महामानवांच्या सामर्थ्याचे प्रतिक

त.भा. प्रतिनिधी

- डॉ. श्रीपाल सबनीस : लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचा पुरस्कार वितरण सोहळा

कोल्हापूर : भारत हा कोणत्याही एका महामानवाचा, एका धर्माचा अथवा एका विचार परंपरेचा देश नसून बुद्ध, महावीर, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, महात्मा गांधी, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि अण्णाभाऊ साठे यांच्यासह सर्व महामानवांच्या मानवतावादी सामर्थ्याची बेरीज म्हणजे भारत होय, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे शाहू स्मारक भवन येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार, तर ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि ज्येष्ठ पत्रकार, लेखक डॉ. संजय थोरात यांना लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी प्रमुख अतिथी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह पुरस्कारप्राप्त डॉ. एन. डी. जत्राटकर आणि डॉ. संजय थोरात यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. हरिष भालेराव, डी. जी. भास्कर, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. जी. बी. अंबपकर, अनिल म्हमाणे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मानसिंग टाकळे यांच्यासह शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.



कोल्हापूर : कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस. बाजूस (डावीकडून) डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. एन. डी. जत्राटकर, महेंद्र भारती, डॉ. संजय थोरात व डॉ. आलोक जत्राटकर.

## ज्ञानाचे लोकशाहीकरण करणारा शब्दकोश...

पुरस्काराला उत्तर देताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी लोकशिक्षक बाबा भारती यांच्या कार्याचा गौरव केला. पाली–मराठी शब्दकोशाच्या माध्यमातून त्यांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अतुलनीय कार्य केले. हा शब्दकोश केवळ शब्दांचा संग्रह नसून ज्ञानाचे लोकशाहीकरण करणारा आणि सामान्य माणसाला मूळ बुद्धविचारांशी जोडणारा महत्त्वपूर्ण सेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

2 3 AUG 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# महायुद्ध रोखण्याची बुद्ध विचारात ताकद : सबनीस

## कुलगुरू कामत, जत्राटकर, यांना बाबा भारती पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापुरात शाहू स्मारक भवनात शुक्रवारी "बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार" डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. राजनीश कामत, डॉ. एन. डी. जत्राटकर आणि डॉ. संजय थोरात यांना देण्यात आला. यावेळी डॉ. पांडुरंग भोसले, डॉ. रणधीर शिंदे, महेंद्र भारती आणि आलोक जत्राटकर उपस्थित होते. छाया : आदित्य वेल्हाळ

**कोल्हापूर :** आज जगाला संवादाची गरज आहे. वेगवेगळे देश एकमेकांविरोधात उभे ठाकले असताना ते जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे नेत आहेत, ते रोखण्याची ताकद गौतम बुद्धांच्या विचारात आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

येथील राजर्षी शाहू स्मारक भवनात हा समारंभ पार पडला. पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या स्मरणार्थ, पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानतर्फे "लोकशिक्षक बाबा भारती जीवन गौरव पुरस्कार" कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना शुक्रवारी डॉ. सबनीस यांच्या हस्ते देण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रतिष्ठानचा लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार निपाणी येथील समाजशास्त्रज्ञ डॉ. एन. डी. जत्राटकर आणि पत्रकार डॉ. संजय थोरात यांनाही देण्यात आला.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, शब्दकोषात शब्द नव्हे, संदर्भ महत्त्वाचा आहे, हे बाबा भारती यांनी जाणले. म्हणूनच ते लोकशिक्षक ठरले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी आभार मानले.

शिवाजी विद्यापीठातील पाली भाषेच्या अभ्यासक्रमाला बाबा भारतींचे नाव देण्याबाबत विचार व्हावा, अशी अपेक्षा डॉ. सबनीस यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
2 3 AUG 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कला, क्रीडा उदरनिर्वाहासाठी उपयुक्त

## कुलसचिव डॉ. विलास शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

साहित्य, संस्कृती, कला आणि क्रीडा हे सर्व घटक उदरनिर्वाहासाठी उपयुक्त आहेत. प्रत्यक्षात कौशल्य संपादन केल्यास निश्चित उज्ज्वल भविष्य आहे. यासाठी शास्त्रशुद्ध माहिती असणे खूप गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

विद्यार्थी विकास विभाग आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सांस्कृतिक समन्वयकांना कलाप्रकारांची शास्त्रोक्त माहिती होण्यासाठी राजर्षी शाहू सभागृहामध्ये दोनदिवसीय 'लोककला आणि लोकनृत्य माहिती कार्यशाळेचे' आयोजन केले होते.

यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, पारंपरिक लोककला व लोकनृत्याचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी, त्याचबरोबर समाजातील प्रत्येक माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यापीठ विविध माध्यमांतून प्रयत्न करत आहे. बदल हा सातत्याने स्वीकारला पाहिजे. तरच माणूस तरुण, दीर्घायुषी आणि निरामय जीवन जगू शकतो. कार्यशाळेमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून अचूक तंत्र, नवीन पिढीमध्ये कला, संस्कृतीची आवड निर्माण करणे, लोककलेचा वारसा आणि त्यामागील सामाजिक पार्श्वभूमीची माहिती उपलब्ध होणार आहे.

त्यानंतर प्रथम सत्रामध्ये सोलापूरचे राजेश पंचे यांनी, तर द्वितीय सत्रामध्ये मुंबईचे संदीप पाटील यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावळीराम घाणे यांनी प्रास्ताविक, डॉ. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शंतनू पाटील, डॉ. एम. बी. पोतदार आदी उपस्थित होते.